सहायक महसूल अधिकारी संवर्गातून नायब तहसिलदार संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियमित पदोन्नतीने पदस्थापना देणेबाबत (छत्रपती संभाजीनगर विभाग)..

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्रमांकः एसआरव्ही-२०२५/प्र.क्र.६० (भाग-१)/ई-९**
**(E-१२७९१६५)**
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २९ जानेवारी, २०२६

**वाचा :-**

१) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र.जा.क्र.२०२५/मशाका/२/आस्था/रा-२/प्र.क्र., दि.०९.०४.२०२५

**शासन आदेश:-**

छत्रपती संभाजीनगर विभागातील सहायक महसूल अधिकारी संवर्गातील खालील तक्त्यात नमूद कर्मचाऱ्यास नायब तहसिलदार (राजपत्रित, गट -ब) या संवर्गात सन २०२४-२५ या निवडसूची वर्षात सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या सहमतीनुसार व सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे नियमित पदोन्नती कोट्यात रिक्त झालेल्या पदावर खुल्या प्रवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियमित पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच, त्यांची नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना खालील तक्त्यातील स्तंभ क्र.५ येथे नमूद पदावर परिच्छेद क्र.२ येथील अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

**अ) नियमित पदोन्नती :**

**१) सहायक महसूल अधिकारी - ०१**

| अ. क्र. | ज्येष्ठता क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव | पात्रता | पदोन्नतीने पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १७९३ | श्री.कैलास श्रोते | सेवाज्येष्ठतेनुसार नियमित पदोन्नतीस पात्र | नायब तहसिलदार (महसूल-२), तहसिल कार्यालय माहूर, जि.नांदेड या रिक्त पदावर |

२. उक्त अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नती कोट्यात रिक्त झालेल्या पदावर नियमित पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१) निवडसूची तयार करताना कोणीही ज्येष्ठ कर्मचारी अनावधानाने वगळण्यात आलेले नाही अथवा अधिक्रमीत झालेले नाही.

२) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात भरण्याबाबत सा.प्र.वि./१६-ब कार्यासनाच्या दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांनुसार

सदर मान्यता देण्यात येत आहे. तसेच दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून, त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर सहमती देण्यात येत आहे.

३) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरती पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा कोणताही हक्क असणार नाही.

४) सदर निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता घेण्याची दक्षता विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी घ्यावी.

५) नायब तहसिलदार या संवर्गात पदोन्नती देण्यात येत असलेल्या वरील अधिकारी पदस्थापनेनंतर प्रत्यक्ष रूजू झाल्याखेरीज पदोन्नतीच्या संवर्गाच्या वेतनाचा लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

६) वरील अधिका-यांनी पदोन्नतीनंतर नायब तहसिलदार संवर्गात देण्यात आलेल्या पदस्थापनेच्या पदावर ३० दिवसांच्या आत रूजू न झाल्यास संबंधित अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता गमावली जाईल तसेच त्यांची पदोन्नती रद्द करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

७) सदर तात्पुरत्या पदोन्नतीच्या अनुषंगाने पदस्थापनेचे आदेश प्राप्त झाल्यापासून संबंधित अधिकाऱ्यांची शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करू नये.

८) तसेच भविष्यात न्यायालयीन अथवा पदोन्नतीच्या अनुषंगाने इतर काही आक्षेप निघाल्यास याची संपुर्ण जबाबदारी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग या कार्यालयाची राहील.

३. सदर आदेश तात्काळ अंमलात येत असून, उपरोक्त अधिकाऱ्यांना पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी कार्यमुक्त करावे व सदर अधिकाऱ्यांना पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रूजू करून घ्यावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयाने शासनास सादर करावा.

४. सदर आदेश सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०१२९१२४५२२९११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIKANT
MADHUKAR MOHITE

Digitally signed by SHRIKANT MADHUKAR MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=5B514D2C3257BBA976C5A2DE42BE8A635BBA691C05D1F65ED0EAD155A190E90E, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=5F152866E6FC64E39CF88B9CB27AE0169A65B000039B269233C42B5B77F06B31, cn=SHRIKANT MADHUKAR MOHITE
Date: 2026.01.29 12:46:09 +05'30'

**(श्रीकांत म. मोहिते)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.

३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
५. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
६. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई ३२.
७. जिल्हाधिकारी, नांदेड
८. प्रधान महालेखापाल, (लेखापरीक्षा व लेखा अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड
१०. संबंधीत अधिकारी (विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्यामार्फत).
११. निवडनस्ती, कार्यासन आस्था-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.